# नियमीत विचारण्यांत येणारे प्रश्न (FAQs)

## ऑनलाईन अर्ज सादर करणेपुर्वी काय करावे ?

- विद्यापीठाचे संकेतस्थळ www.mafsu.in/le.mafsu.in यावर लॉगईन करावे.
- संबंधीत अभ्यासक्रमावर click करावे.
- माहिती पुस्तिकेच्या लिंकवर click करावे. माहिती पुस्तिका काळजीपुर्वक वाचावी आणि अभ्यासक्रमाच्या अर्हतेसंबंधी अटी व शर्ती, आरक्षण, weightage इत्यादी समजुन घ्यावे. माहिती पुस्तिका व अभ्यासक्रम प्रोग्राम तुमच्या माहिती करिता जतन करून ठेवा.
- अभ्यासक्रमासाठी आवश्यक दस्तावेज/प्रमाणपत्राची यादी तयार करावी.
- दस्तावेज/प्रमाणपत्र अशा पध्दतीने स्कॅन करावे जेणे करून त्यातील मजकूर वाचण्यायोग्य/सुस्पष्ट असावा. भ्रमणध्वनी व्दारे स्कॅन करणे टाळावे. दस्तावेज/प्रमाणपत्र अचुक स्कॅन करणे ही सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील.
- दस्ताऐवजाचे दोन्ही बाजू स्कॅन करावयाचे असल्यास एकच JPG/PNG file तयार करावी. एकापेक्षा जास्त प्रमाणपत्रे upload करावयाचे असल्यास या पध्दतीने करावे. (उदा. ईयत्ता 10 वी चे दोन गुणपत्रिका किंवा अतिरिक्त प्रतिज्ञापत्र, प्रमाणपत्र किंवा नाव बदल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र इत्यादी)
- स्कॅन केलेले दस्तावेज save करून फाईल नाव द्यावे, जसे. TC, NCL, Caste Certificate, SSC Mark Sheet etc. ज्यामुळे दस्ताऐवजांमधील दुरूस्ती/सुधारणा करण्यास मदत होईल.

## नोंदणी कशी करावी ?

- संबंधीत अभ्यासक्रमावर क्लिक करावे.
- त्यामध्ये दोन लिंक असतील – ′′Online Registration” व “Login for filling aplication”
- नोंदणी करिता Online Registration वर click करावे.
- विभाग निवडून पदविका विद्यालयाचे क्रमानुसार प्राधान्य निवडावे.
- सर्व आवश्यक रकाने जसे नांव, जन्म तारीख, आधार क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक इत्यादी सर्व माहिती भरणे आवश्यक आहे.
- विद्यापीठाव्दारे जाहीर केलेल्या सर्व सुचना आपल्या नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकावर sms व्दारे पाठविण्यात येईल. त्याकरिता सर्व माहिती अचूक भरावी.
- अर्ज सादर करेपर्यंत त्यामध्ये बदल करता येईल. एकदा अर्ज व शुल्क भरणा झाल्यावर अर्जामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

## ऑनलाईन आवेदन शुल्काचा भरणा कसा करावा ?

- अर्जाचे शुल्क फक्त www.onlinesbi.com या ऑनलाईन संकेतस्थळाच्या माध्यमाद्वारे शुल्क स्विकारले जाईल.
- होम पेजमधुन सुध्दा एस. बी. आय. द्वारे शुल्क सादर करता येईल. अटी मान्य केल्याचा बॉक्स सीलेक्ट करून Proceed बटन दाबावी.
- शुल्काची Application form fees निवडुन शुल्काचा भरणा Debit Card/Credit Card किंवा Internet Banking व्दारे करता येईल.
- एकदा सादर केलेले शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत करता येणार नाही.

## ऑनलाईन आवेदन अर्ज कसे भरावे ?

- ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता असलेल्या संकेतस्थळावरील सुचनेप्रमाणे अर्जदाराने अर्ज भरावा.

## प्रमाणपत्र/दस्तावेज upload करतांना कोणती काळजी घ्यावी ?

- ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता असलेल्या संकेतस्थळावरील सुचनेप्रमाणे अर्जदाराने प्रमाणपत्र/दस्तावेज upload करतांना काळजी घ्यावी.

## अर्जाचा पासवर्ड विसरले असल्यास काय करावे ?

- ज्या अभ्यासक्रमासाठी अर्ज सादर केला आहे त्यावर click करावे व Registered User click करावे. लॉगईन पेज दिसेल.
- Forget Password/Application ID वर click करावे. सर्व माहिती बरोबर भरल्यानंतर आपला Application ID व Password स्कीन वर दिसेल.

## फेरसादर करण्याची सुविधा काय आहे ?

- अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत अर्ज प्राप्त झाल्यावर, त्यांची प्राथमीक तपासणी होईल त्यामध्ये चुकीचे दस्तावेज सादर केलेल्या उमेंद्वारांच्या नावाची यादी वेबसाईट वर जाहीर करण्यात येईल. अशा उमेद्वारांना आवश्यक दस्तावेज upload करण्याची निश्चीत केलेल्या दिनांकापुर्वी सादर करण्याची संधी देण्यात येईल अशा त्रुटींची पुर्तता करण्याची सर्वस्वी जबाबदारी उमेद्वाराची राहील.

## तात्पुरती गुणवत्ता यादी, अंतिम गुणवत्ता यादी किंवा पर्याय भरण्यासंबंधी केलेली विनंती, प्रवेश वाटप, reporting माहिती कशी जाणुन घ्यावी ?

- उमेद्वाराने वारंवार वेबसाईट वर जाऊन प्रवेश कार्यक्रमानुसार प्रवेशासंबंधीची माहिती अवगत ठेवावी.
- तसेच Application ID व Password ने login करून गुणवत्ता यादी व प्रवेश वाटप तपासावे.